॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
North Maharashtra University, Jalgaon
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
A' Grade
'(NAAC Re-Accredited )
3rd Cycle
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९,२५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

**बातमी - १**

जळगाव 10 ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यापीठस्तरीय युवारंग युवक महोत्सवाला सोमवार, दि.12 फेब्रुवारी पासून प्रारंभ होत आहे.

संगीत, नृत्य, साहित्यकला, नाटयकला व ललितकला या पाच कला प्रकारातली 25 उपकलाप्रकारात होणाऱ्या महोत्सवाचे उद्घाटन सोमवार, दि.12 फेब्रवारी रोजी सकाळी 8 वाजता विद्यापीठाच्या पदवीप्रदान सभागृहात होणार आहे. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर हे उपस्थित राहणार आहेत.

यापूर्वी विद्यापीठाने 25 ते 31 जानेवारी दरम्यान चार ठिकाणी जिल्हास्तरीय युवक महोत्सव घेतले. तेथील प्रथम, द्वितीय व तृतीय विजेत्यांचा हा विद्यापीठस्तरीय महोत्सव होत आहे. यामध्ये 60 पेक्षाही अधिक महाविद्यालयांमधील जवळपास 883 जण सहभागी होणार असून त्यामध्ये 595 विद्यार्थी, 157 संगीत साथीदार, 131 संघव्यवस्थापक यांचा समावेश आहे. बाहेर गावाहून येणाऱ्या कलावंतांची निवास व्यवस्था वसतिगृह व इनडोअर स्टेडीयम येथे करण्यात आली आहे. विद्यापीठ परिसरात या महोत्सवासाठी सहा रंगमंच तयार करण्यात आले आहेत.

सोमवारी उद्घाटनानंतर सकाळी 9 वाजता दीक्षांत सभागृहात मुकनाटय, विडंबन नाट्य, मिमिक्री, शास्त्रीय नृत्य, समुह लोकनृत्य या कलाप्रकारातील स्पर्धा होतील. अधिसभा सभागृहात शास्त्रीय गायन, सुगम गायन आणि समुह गीत (भारतीय) या स्पर्धा होणार आहेत. रंगमंच क्रमांक 3 म्हणजे डॉ.एपीजे अब्दुल कलाम विद्यार्थी भवन येथे शास्त्रीय वादन (सुरवाद्य), शास्त्रीय वादन (तालवाद्य), भारतीय लोकगीत व लोकसंगीत हे कलाप्रकार सादर होतील. रंगमंच क्रमांक 4 म्हणजे पर्यावरणशास्त्र प्रशाळेच्या सभागृहात वर्क्तृत्व, काव्यवाचन, वादविवाद, सुगमगायन (पाश्चिमात्य) व समुह गायन (पाश्चिमात्य) हे कलाप्रकार होतील. रंगमंच 5 व 6 म्हणजे ग्रंथालयाच्या इमारतीत व परिसरात रांगोळी, चित्रकला,कोलाज, स्पॉट पेटींग, क्ले मॉडेलिंग, फोटोग्राफी, इन्स्टॉलेशन व रंगचित्र या स्पर्धा होणार आहेत.

मंगळवारी बक्षीस समारंभ

मंगळवार दिनांक 13 फेब्रुवारी रोजी सकाळी 11 वाजता दीक्षांत सभागृहात पारितोषिक वितरण समारंभ होणार असून खान्देशातील रंगकर्मी व कॉमेडीची बुलेट ट्रेन फेम श्याम राजपूत यांच्या हस्ते पारितोषिके दिली जाणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील राहतील. प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर, युवक महोत्सवाचे कार्याध्यक्ष दिलीप पाटील यांची उपस्थिती असेल.

या महोत्सवाची तयारी पूर्ण झाली असून उद्या रविवार दिनांक 11 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 6 वाजता अधिसभा सभागृहात संघव्यवस्थापकांची बैठक ठेवण्यात आली आहे अशी माहिती कुलसचिव भ.भा. पाटील व विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा.एस.टी.इंगळे यांनी दिली.

पान 2 वर

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

A' Grade

'(NAAC Re-Accredited )

3rd Cycle

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९,२५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६



**बातमी - २**

जळगाव- 10 ( ) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2017 तील भाग 99 अ मधील उपकलम (4) (अ) नुसार शैक्षणिक वर्ष 2017-18 करीता विद्यापीठ विद्यार्थी परिषद सदस्यांचे नामनिर्देशन कुलगुरुंकडून करण्यात आलेले आहे. अधिनियमातील उपकलम (4) (ब) नुसार या 15 सदस्यांमधून अध्यक्ष व सचिव पदासाठीची निवडणूक लवकरच होणार आहे.

विद्यार्थी परिषदेचे सदस्य पुढीलप्रमाणे-

(1) अनुसूचित जाती संवर्ग - **तायडे हर्षा युवराज**, पी.के. कोटेचा महिला महाविद्यालय, भुसावळ (2) अनुसूचित जमाती- **वसावे प्रकाश कालूसिंग** , एस.जे.एम.एस.एम वाणिज्य, कला व विज्ञान महाविद्यालय, खापर (3) विमुक्त जाती व भटक्या जमाती - **राजपूत कांचन चंद्रसींग** , श्री.प्रकाशचंद्र जैन शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जामनेर (4) इतर मागासवर्ग - **पवार डिगंबर अशोक**, महात्मा फुले समाजकार्य महाविद्यालय, तळोदा (5) महिला- चौधरी प्रियंका सतीश, जी.जी.खडसे महाविद्यालय, मुक्ताईनगर, विविध महाविद्यालयातील सचिव- **पाटील राधिका सुरेश**, सोनामाई शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय, शहादा, **पाटील मनोज प्रभाकर**, सोध्दारक विद्यार्थी संस्थेचे दादासाहेब रावळ महाविद्यालय, दोंडाईचा, **पाटील नेहा रवींद्र** , नानासाहेब य.ना.चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चाळीसगाव, **कुंवर किर्ती कालिदास**, कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपळनेर, **पाटील पुनम भाऊसाहेब**, ग्रामविकास शिक्षण मंडळाचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अमळनेर, **जैन शुभम गौतमचंद**, एचआरपटेल इन्स्टिट्युट ऑफ फार्मा, शिरपूर, **येसकर शुभांगी सुनील,** बोदवड सार्वजनिक शैक्षणिक संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बोदवड, **चौधरी स्वप्निल सुधाकर**, धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, **भोंगळे शुभम रामेश्वर**, मु.जे. महाविद्यालय, जळगाव, **पाटील योगिता रवींद्र** , कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साक्री.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ — दि. १० फेब्रुवारी, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

(सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी